**MHRG040006112026**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २८.०१.२०२६ |
| नोंदणी तारीख | : | ११.०२.२०२६ |
| निकाल तारीख | : | १२.०३.२०२६ |
| कालावधी | : | ०० ०१ १५<br>व. म. दि. |

**३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पनवेल, जि. रायगड**

(पिठासीन अधिकारी राजश्री एम. गणवीर)

**हिं.वि.या.क्र. १३७/२०२६** **निशाणी क्र. /अ**

**<u>हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३(ब) प्रमाणे आपसी संमतीने घटस्फोट मिळण्याकरीता</u>**

..............................................................................................

अर्जदार क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री.सचिन अं. म्हात्रे

. ..............................................................................................

**<u>न्यायनिर्णय</u>**

(पारीत दिनांक १२ मार्च, २०२६)

याचिकाकर्ता यांनी सदर याचिका हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३(ब) प्रमाणे आपसी संमतीने घटस्फोट मिळण्याकरीता दाखल केली आहे.

२. अर्जदार क्र. १ व २ हे पती–पत्नी असून, त्यांचा विवाह दिनांक २९/११/२०२१ रोजी हिंदु विवाह पध्दतीने मौजे. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथे संपन्न झाला. विवाहानंतर अर्जदार क्र.२ ही अर्जदार क्र.१ कडे नांदावयास गेली. सदर लग्न संबंधातुन त्यांना कोणतेही अपत्य नाही. लग्नानंतर अर्जदार हे काही महिने सोबत राहीले. त्यानंतर त्यांच्यामध्ये वाद निर्माण झाला व त्यांना एकत्र राहणे कठीण झाले व त्या कारणामुळे दिनांक २१/०४/२०२३ पासून ते दोघेही एकमेकांपासून वेगळे राहत आहे. त्यांच्या दोघांमधील विकोपाला गेलेले संबंध, गैरसमज दूर करून त्यांना दोघांना एकत्र आणण्यासाठी दोघांच्याही नातेवाईकांनी बरेच प्रयत्न केले, परंतु त्यांच्यातील वाद दुर करण्यास ते अपयशी ठरले व दोघांनाही एकत्र राहणे अशक्य झाले. दोघे एकत्र राहू शकत नाही म्हणून त्यांनी आपसी संमतीने घटस्फोट

मिळण्याकरीता सदर केस वैवाहीक संबंध संपूष्टात येण्यासाठी दोघांनी मिळून दाखल केली आहे.

३. अर्जदार क्र.१ व २ यांनी पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र. १२ व नि.क्र. १३) दाखल केले आहे. अर्जदार यांचे विवाह पत्रीका नि.क्र.१४, अर्जदार यांचे लग्नाचा फोटो नि.क्र. १५, अर्जदार यांचे आधारकार्डची प्रमाणित प्रत नि.क्र. १६ व १७, पुरावा बंद पुरशीस नि.क्र. १८ वर दाखल आहे.

४. अर्जदार यांनी अर्ज नि.क्र. ९ दाखल करुन सहा महिन्याचा कालावधी माफ करण्याची प्रार्थना केली. अर्जदार यांच्यामध्ये समेट घडून येईल असे दिसून येत नसल्यामूळे अर्ज नि.क्र. ९ वरील आदेशानूसार सहा महीन्यांचा कालावधी माफ करण्यात आला.

५. अर्जदारांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात कथन केले आहे की, ते पती–पत्नी असून, त्यांचा विवाह दिनांक २९/११/२०२१ रोजी हिंदु विवाह पध्दतीने मौजे. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथे संपन्न झाला. विवाहानंतर अर्जदार क्र.२ ही अर्जदार क्र.१ कडे नांदावयास गेली. सदर लग्न संबंधातुन त्यांना कोणतेही अपत्य नाही. लग्नानंतर ते काही महिने सोबत राहीले. त्यानंतर त्याच्यामध्ये वाद निर्माण झाला व त्यांना एकत्र राहणे कठीण झाले व त्या कारणामुळे दिनांक २१/०४/२०२३ पासून ते दोघेही एकमेकांपासून वेगळे राहत आहे. दोघांनाही एकत्र राहणे अशक्य झाले. दोघे एकत्र राहू शकत नाही म्हणून त्यांनी आपसी संमतीने घटस्फोट मिळण्याकरीता सदर केस वैवाहीक संबंध संपूष्टात येण्यासाठी दोघांनी मिळून दाखल केली आहे.

६. अर्जदार यांनी आपसी सहमतीने सोडचिठ्ठी घेण्याचे ठरविले आहे. त्यांच्यात देणे–घेणे बाकी राहिलेले नाही. त्यांना आता वैवाहीक संबंध ठेवायचे नाही व एकत्र राहायचे नाही. त्यांच्यात देण्या–घेण्याबाबत कोणताही वाद दिसून येत नाही. घटस्फोटानंतर ते आपल्या मर्जीनुसार स्वतंत्र जीवन जगण्यास मोकळे राहतील. अर्जदार यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची बळजबरी, कपट व गैरवाजवी दडपण असल्याचे दिसून येत नाही. ही याचिका नामंजूर करण्यास कोणतेही सबळ कारण दिसून येत नाही. याचिकाकर्ते पती–पत्नी म्हणून भविष्यात एकत्र राहू शकत नाही, म्हणून सदर याचिका मंजूर करुन, खालील आदेश पारित करण्यात येते.

**आदेश**

१) अर्जदार क्र.१) श्री. सिध्दांत चांगदेव पवार व २) सौ. श्रध्दा सिध्दांत पवार यांचा दिनांक २९/११/२०२१ रोजीचा विवाह, हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३–ब नुसार आपसी संमतीने विच्छेदीत करण्यात येवून घटस्फोट आजपासून मंजूर करण्यात येतो.

२) येणेप्रमाणे घटस्फोटाचा हुकूमनामा तयार करावा.

RAJSHRI MANOHAR GANVIR

Digitally signed by RAJSHRI MANOHAR GANVIR
Date: 2026.03.13 13:00:49 +0530

पनवेल (राजश्री एम. गणवीर)

**दिनांक : १२.०३.२०२६** **३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,पनवेल.**